गुरुवार दि. ०८ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मजुरांना गावातच तात्काळ कामे उपलब्ध करून द्यावीत –जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## जलसंधारण व मृदसंधारणाच्या कामांना प्राधान्य; जालना जलकवच अभियान प्रभावीपणे राबविण्याचे जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक मजुराला तात्काळ रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यासाठी ग्रामपंचायतनिहाय पुरेशी कामे मंजूर करून कामांचा 'शेल्फ ऑफ प्रोजेक्ट्स' तयार ठेवावा. तसेच जलसंधारण व मृदसंधारणाची जास्तीत जास्त कामे हाती घेऊन मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात (दि.६रोजी) जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी तसेच व्ही.बी.जी. राम जी अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कणवारिया, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) सुरेश वडोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



ग्रामपंचायतनिहाय मजुरांच्या कामाच्या मागणीचा विचार करून आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त कामे मंजूर करावीत. 'जालना जलकवच' अभियानांतर्गत जलतारा, शोषखड्डे, छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, गाळ काढणे तसेच अन्य जलसंधारण व मृदसंधारणाची कामे प्राधान्याने सुरू करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जलसाठे निर्माण करणे, भूजलपातळी वाढविणे आणि पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संधारण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यमान जलसाठ्यांमधील गाळ काढणे, आवश्यक दुरुस्ती करून साठवण क्षमता वाढविणे तसेच संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर योजनेअंतर्गत चारा लागवडीची कामे घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. काम मागणी करणाऱ्या सर्व मजुरांना विलंब न करता काम उपलब्ध करून देण्यासोबतच कामावर येणाऱ्या मजुरांची ई-केवायसी पूर्ण करून घेण्याचे निर्देशही देण्यात आले. ऑक्टोबर २०२६ मध्ये होणाऱ्या (पान २ वर)

# जालन्यात 'विकसित भारत २०४७ संकल्प सभा उत्साहात, सेवा ज्योती यात्रेतून राष्ट्रसेवेचा निर्धार

## सेवा हाच धर्म, विकसित भारत हेच ध्येय - माजी मंत्री डॉ. भागवत कराड
## जनतेचा विश्वास हीच मोदीजींची खरी शक्ती - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

जनतेचा विश्वास हीच प्रेरणाशक्ती मानून आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. जनसेवेच्या या प्रवासाला आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी सेवाप्रवासानिमित्त भाजपाच्या वतीने देशभरात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. याच अभियानांतर्गत भाजपा जालना महानगर च्या वतीने आयोजित विकसित भारत २०४७ संकल्प सभा दि. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, जालना येथे मोठ्या उत्साहात भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा



दानवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या वेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री डॉ. भागवत कराड बोलत होते. व्यासपीठावर महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, अरुणा जाधव, वसंत शिंदे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, अमोल धानुरे, मोहन राऊत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे, विमल आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली व आपल्या प्रशासकीय कामाला सुरुवात केली त्यांचा या प्रशासकीय प्रवासाला आज २५ वर्षे पूर्ण होत आहे. या २५ वर्षाच्या प्रवासाचे सर्व श्रेय ते देशातील करोडो कार्यकर्ते, लाखो स्वयंसेवक व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना देतात. देशाच्या प्रमुख पदावर काम करून सुद्धा स्वतःला पंतप्रधान न संबोधता प्रधान सेवक म्हणतात व सेवा हाच धर्म, विकसित भारत हेच ध्येय अशा या दूरदृष्टी नेत्याच्या काळात भारत विश्वगुरु बनल्याशिवाय राहणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. असे बोलताना त्यांनी सांगितले व सर्वांना संकल्प शपथ देण्यात आली. या वेळी बोलताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष (पान २ वर)

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा; पीक कर्जाच्या पुनर्गठनासह वसुलीला स्थगिती

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे जिल्ह्यातील सर्व बँकांना निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२६ मध्ये -१ (प्रथम कळ) लागू झाल्याने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांचा समावेश आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या सवलतींचा लाभ मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा बँकर्स समितीच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांनी जिल्ह्यातील सर्व बँकांना विविध महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. जिल्ह्यातील बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन आणि जाफ्राबाद या आठही तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या () मार्गदर्शक तत्त्वांनुसार तातडीने पुनर्गठन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन सक्तीची वसुली टाळण्याचे आदेश बँकांना देण्यात आले आहेत. पात्र शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी कोणत्याही प्रकारचा अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे. पुनर्गठित, स्थगित तसेच प्रलंबित कर्ज खात्यांची शाखानिहाय स्वतंत्र नोंद ठेवावेत. यासोबतच दुष्काळी अनुदान, घरकुल, पीएम-किसान, 'लाडकी बहीण', पीक विमा () भरपाई तसेच इतर शासकीय योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांना वेळेत मिळतील, यासाठी बँकांनी कार्यवाही करावी. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर पुन्हा कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्यात यावे. बँकनिहाय आणि शाखानिहाय अनुपालन अहवाल जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कर्ज आणि शासकीय योजनांच्या लाभांबाबत कोणतीही अडचण येऊ (पान २ वर)

# वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन सर्व शासकीय, निमशासकीय व शैक्षणिक संस्थांना आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. शासन परिपत्रकानुसार वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील राज्यातील कार्यालये, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, खाजगी उद्योग व आस्थापना, व्यापारी बँका तसेच सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांनी वाचन प्रेरणा दिन साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले आहे.

वाचनाची सवय समाजात रुजविणे, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे. तसेच ज्ञान, विचार आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे, या उद्देशाने विविध वाचनविषयक उपक्रम आयोजित करण्यावर भर देण्यात आला आहे. संबंधित सर्व संस्थांनी आपल्या स्तरावर योग्य त्या उपक्रमांचे आयोजन करून, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या सूचनेनुसार वाचन प्रेरणा दिनाचा उपक्रम व्यापक स्वरूपात राबवून नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही प्रशासनाने म्हटले आहे. हे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) मनिषा दांडगे, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# भोकरदन तालुक्यात पावसाअभावी पिके करपली

## तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके यांची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भोकरदन तालुका आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून पावसाने प्रदीर्घ दडी मारल्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे धोक्यात आला आहे. विशेषतः हसनाबाद सर्कल (वर्तुळ) आणि आसपासच्या भागात पाण्याअभावी शेतातील उभी पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या गंभीर दुष्काळी परिस्थितीची दखल घेऊन सरकारने त्वरित पिकांचे पंचनामे करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आक्रमक मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील यांनी केली आहे.

**हसनाबाद सर्कलसह तालुक्यात पिकांचे नुकसान**

भोकरदन तालुक्यातील हसनाबाद सर्कल आणि इतर भागात पावसाअभावी सोयाबीन, कपाशी, मका, मूग आणि तूर यांसारखी मुख्य खरीप पिके ऐन फुलोऱ्यात आणि शेंगा धरण्याच्या अवस्थेत जळून खाक झाली



आहेत. जमिनीला मोठ्या भेगा पडल्या असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

**तात्काळ पंचनाम्यांची मागणी**

शासनाने आणि महसूल प्रशासनाने कुठलाही विलंब न करता भोकरदन तालुक्यातील, विशेषतः हसनाबाद भागातील प्रत्येक बाधित शेताची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, जेणेकरून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही.

**हेक्टरी आर्थिक मदत द्या**

पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचा पेरणीचा, खतांचा आणि मशागतीचा खर्चही वसूल झालेला नाही. त्यामुळे शासनाने कोरडा दुष्काळ सदृश परिस्थिती लक्षात घेऊन हेक्टरी ठोस आर्थिक मदत द्यावी.

**मोसंबी बागांना फटका**

जालना जिल्हा आणि भोकरदन तालुका हा मोसंबीचा आगार मानला जातो, परंतु पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे मोसंबीच्या बागा देखील उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे फळबागायतदार शेतकऱ्यांनाही विशेष पॅकेज देण्यात यावे.

**कर्जमाफी आणि वीजबिल सवलत**

ज्या शेतकऱ्यांनी बँका आणि (पान २ वर)

# सुरळीत वीजपुरवठा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार कटिबद्ध, – आमदार बबनराव लोणीकर

## मोदी सरकारने पीक विम्याच्या पद्धतीत बदल करून संरक्षणाची व्याप्ती वाढवली

**परतुर - प्रतिनिधी**

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या माध्यमातून देशातील ८१ कोटी ३५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. कोरोना महामारीसारख्या संकटाच्या काळातही गरीब कुटुंबांच्या घरातील चूल विझू नये, यासाठी या योजनेने महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ६० कोटींपेक्षा अधिक नागरिकांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य संरक्षणाचा लाभ मिळत आहे. आयुष्मान आरोग्य मंदिरांमधून प्राथमिक



आरोग्यसेवाही सामान्य नागरिकांच्या जवळ पोहोचत आहे. गरीब माणसाला अन्न आणि गंभीर आजाराच्या वेळी उपचाराचे संरक्षण देणाऱ्या या दोन योजनांचा उल्लेख करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सामान्य माणसाच्या जीवनातील मूलभूत गरजांना प्राधान्य दिले असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. गाव फिडर योजना, मजबूत वीज वितरण जाळे, प्रधानमंत्री सौभाग्य योजना आणि प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना यामुळे देशातील ऊर्जा व्यवस्थेत मोठा विस्तार झाला आहे. सौभाग्य योजनेअंतर्गत देशात सुमारे २ कोटी ८६ लाख घरांना वीज जोडणी देण्यात आली असून इच्छुक वीजविहीन घरांचे विद्युतीकरण पूर्ण करण्यासाठी केंद्राने मोठी मोहीम राबवली. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून छतावरील सौरऊर्जेला मोठी चालना मिळत असून मे २०२६ पर्यंत ३३ लाखांहून अधिक रूफटॉप सोलार प्रणाली बसवण्यात आल्या होत्या; योजनेचे उद्दिष्ट एक कोटी घरांपर्यंत पोहोचण्याचे आहे. महाराष्ट्रासह देशात दुष्काळी परिस्थिती असतानाही सर्वसामान्यांना शक्य तितका सुरळीत वीजपुरवठा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार शर्थीचे प्रयत्न (पान २ वर)

# सेवा संकल्प अभियान; संघटनात्मक आढावा बैठक कार्यकर्ता संवाद व संपर्क' विशेष अभियान सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर -प्रतिनिधी** : सेवा संकल्प अभियानाच्या मराठवाडा विभागातील प्रवासादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय जनता पार्टीच्या विभागीय कार्यालयात जिल्हाध्यक्ष श्री. सुरेश बनकर, जिल्हाध्यक्ष श्री. संजय खंबायते आणि महानगराध्यक्ष श्री. किशोर शितोळे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण संघटनात्मक आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत सेवा संकल्प अभियानाचा आढावा, बूथस्तरावरील संघटनात्मक कार्य, कार्यकर्ता संपर्क तसेच आगामी निवडणुकांच्या दृष्टीने करण्यात येणारे नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी २०२९ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक कामकाजाला गती देण्याच्या दृष्टीने बूथस्तरावर अधिक लक्ष केंद्रित करण्याबाबत चर्चा झाली. मराठवाड्यातील संघटनात्मक प्रवासाच्या पुढील टप्प्यात १० ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यात आणि ११ ऑक्टोबर २०२६ रोजी हिंगोली जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान व संघटनात्मक कार्य' अंतर्गत बूथस्तरीय आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. 'मेरा बूथ सबसे मजबूत' या उद्दिष्टासाठी विशेष संघटनात्मक आखणी करण्यात येणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस मा.आ.सुनिल राणे यांनी सांगितले.

**विकसित भारत संकल्प सभा - भव्य सेवा ज्योती यात्रा**

भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर पूर्व ग्रामीण यांच्या वतीने ऑरेंज फ्लॅग लॉन्स,फुलंब्री येथे आयोजित ''विकसित भारत संकल्प सभा तथा भव्य सेवा ज्योती यात्रा'' या भव्य कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधत प्रदेश सरचिटणीस मा.आ.सुनिल राणे उपस्थितांना संबोधित केले. याप्रसंगी देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी तसेच भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. नितीनजी नवीन यांच्या ऑनलाइन (पान २ वर)

# संपादकीय...

## पोलिसांनीही आता आकडेवारी द्यावी

डॉक्टरांना धमकावणे, खंडणी मागणे, रुग्णालयात दमदाटी करणे, तोडफोड करणे किंवा सोशल मीडियावर कोणतीही पडताळणी न करता बदनामी करणेया प्रकारांचे समर्थन करण्याचे कोणतेही कारण नाही. डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना भयमुक्त वातावरणात काम करता आले पाहिजे. या दृष्टीने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या जालना शाखेने पोलिस अधीक्षकांकडे केलेली सुरक्षा आणि कारवाईची मागणी गांभीर्याने घेतलीच पाहिजे. पण या मागणीच्या दुसऱ्या बाजूला उभा असलेला प्रश्नही तितकाच गंभीर आहे. रुग्णाला रुग्णालयाकडून अन्याय झाल्याची तक्रार असेल, तर त्याने दाद मागायची कुठे? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजेआपली तक्रार घेऊन सामाजिक कार्यकर्ता, लोकप्रतिनिधी किंवा पत्रकाराकडे गेलेल्या प्रत्येक रुग्णाला 'त्रयस्थ' किंवा 'ब्लॅकमेलर' समजायचे का? या दोन प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय डॉक्टरांच्या सुरक्षेचा आणि रुग्णांच्या हक्कांचा समतोल साधता येणार नाही. रुग्णालयातील गैरप्रकाराबाबत प्रश्न विचारणे, बिलाची चौकशी मागणे, योजनेचा लाभ मिळवून देण्याची विनंती करणे किंवा अधिकृत यंत्रणेकडे तक्रार घेऊन जाणे. ही स्वतःमध्ये गुन्हेगारी कृत्ये नाहीत. दुसरीकडे, तक्रार मागे घेण्यासाठी किंवा कारवाई न करण्यासाठी पैसे मागणे, धमकी देणे अथवा दबाव आणून आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करणे हा पूर्णपणे वेगळा विषय आहे. तक्रारदार आणि खंडणीखोर यांच्यात फरक पुराव्याने ठरतो; केवळ आरोपाने नाही. म्हणूनच पोलिसांनी प्रत्येक प्रकरणाकडे पुराव्याच्या आधारे पाहणे गरजेचे आहे. तक्रार खरी असेल तर संबंधित रुग्णालय किंवा व्यक्तीविरुद्ध चौकशी झाली पाहिजे. तक्रार खोटी असल्याचे स्पष्ट झाले तर तक्रारदारावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. आणि धमकी देऊन आर्थिक फायदा उकळल्याचे सिद्ध झाले तर खंडणीचा गुन्हाही तितक्याच कठोरपणे दाखल झाला पाहिजे. कायदा दोन्ही बाजूंना समान असला पाहिजे. रुग्णाने पत्रकाराकडे धाव घेतली तर तो 'ब्लॅकमेलर' ठरतो का? प्रत्यक्षात सामान्य रुग्णाची परिस्थिती वेगळी असते. रुग्णालयात उपचार सुरू असतात, कुटुंबीय मानसिक तणावात असतात, बिल वाढत जाते आणि योजनेचा लाभ मिळणार की नाही, याबाबत संभ्रम निर्माण होतो. अशा वेळी त्याला प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याची प्रक्रिया माहीत असेलच असे नाही. म्हणूनच तो सामाजिक कार्यकर्त्याला फोन करतो, लोकप्रतिनिधीकडे जातो किंवा पत्रकाराला आपली व्यथा सांगतो. हा हस्तक्षेप बेकायदेशीर आहे असे सरसकट म्हणता येणार नाही. पण याच व्यवस्थेतील काही व्यक्ती रुग्णांच्या तक्रारीचा आधार घेऊन डॉक्टर किंवा रुग्णालयांवर दबाव आणत असतील, आर्थिक मागणी करत असतील, तर त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. म्हणून प्रश्न 'तिसरा पक्ष कोण?' हा नसून 'त्याने नेमके काय केले?' हा असला पाहिजे. जनआरोग्य योजनेत रुग्णाचा हक्क नेमका कुठे उभा आहे?

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेचा उद्देशच आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या पात्र रुग्णांना उपचाराची आर्थिक सुरक्षा देणे हा आहे. अंगीकृत रुग्णालयात पात्र रुग्णाला योजनेच्या नियमांनुसार उपचार मिळत असतील, तर त्या उपचारासाठी अनधिकृत अतिरिक्त रक्कम मागितली जात असल्याची तक्रार अत्यंत गंभीर स्वरूपाची ठरते. राज्य सरकारनेही योजनेंतर्गत उपचार घेताना रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम घेतल्यास कारवाईची भूमिका स्पष्ट केली आहे. मग प्रश्न असा आहे. जालना जिल्ह्यात अशा तक्रारी किती आल्या? किती तक्रारींची चौकशी झाली? किती रुग्णालयांवर कारवाई झाली? किती प्रकरणांत रुग्णांना पैसे परत करण्यात आले? आणि किती प्रकरणांत पैसे परत करण्यापलीकडे नियमभंगाची जबाबदारी निश्चित करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे उपलब्ध झाली तरच जनआरोग्य योजनेतील पारदर्शकतेचे खरे चित्र समोर येईल. जालना जिल्ह्यात एखाद्या रुग्णाकडून योजनेच्या उपचारासाठी पैसे घेतले गेले आणि नंतर ते चेकद्वारे परत करण्यात आले, अशी तक्रार असेल, तर चेक परत मिळाला म्हणजे प्रकरण संपले, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. पैसे का घेतले? रुग्णाकडून किती रक्कम घेतली? त्या वेळी रुग्णाची योजना लागू होती का? संबंधित उपचार योजनेच्या पॅकेजमध्ये समाविष्ट होता का? रुग्णालयाने शासनाकडे त्या उपचाराचा दावा दाखल केला होता का? पैसे परत का केले? रुग्णाने तक्रार केल्यानंतरच पैसे परत केले का?आणि सर्वांत महत्त्वाचेआरोग्य विभागाने नियमभंग झाला की नाही, याची स्वतंत्र चौकशी केली का? हे प्रश्न अनुत्तरित राहिले तर 'रुग्णाला पैसे परत मिळाले' एवढ्यावर समाधान मानणे म्हणजे व्यवस्थेच्या उत्तरदायित्वाचा प्रश्न टाळणे ठरेल. आय एम ए ने डॉक्टरांना धमकी, खंडणी आणि ब्लॅकमेलिंगचे प्रकार होत असल्याचे पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. ही बाब गंभीर आहे. पण आता या गंभीर आरोपांना आकडेवारीची जोड मिळणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत डॉक्टर, रुग्णालय किंवा वैद्यकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध किंवा त्यांच्या संदर्भात खंडणी, धमकी, ब्लॅकमेलिंग याबाबत किती तक्रारी आल्या? त्यापैकी किती एफ आय आर मध्ये रूपांतरित झाल्या? किती आरोपींना अटक झाली? किती प्रकरणांत आरोपपत्र दाखल झाले? किती प्रकरणे अद्याप तपासाधीन आहेत? आणि किती प्रकरणांमध्ये आरोप सिद्ध झाले नाहीत? ही आकडेवारी समोर आली तर डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न भावनिक चर्चेऐवजी तथ्यांच्या आधारावर मांडता येईल. आरोग्य विभागानेही आपला 'डेटा' सार्वजनिक करावा पोलिसांकडून आकडेवारी अपेक्षित आहेच; पण आरोग्य विभाग आणि जनआरोग्य योजनेच्या प्रशासनाचीही तितकीच जबाबदारी आहे.जालना जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयांविरुद्ध आलेल्या तक्रारींची संख्या, त्यातील तक्रारींचे स्वरूप, चौकशीचा निकाल आणि झालेली कारवाई याचा एकत्रित अहवाल सार्वजनिक व्हायला हवा. रुग्णालयांची नावे लपविणे हा पारदर्शकतेचा पर्याय असू शकत नाही; मात्र अपूर्ण किंवा अप्रमाणित आरोपांना दोषसिद्धी म्हणून प्रसिद्ध करणेही योग्य नाही. म्हणून अधिकृत चौकशीच्या निष्कर्षांवर आधारित माहिती जनतेसमोर ठेवणे हाच योग्य मार्ग आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सर्व डॉक्टर गैरप्रकार करतात, असा निष्कर्ष चुकीचा आहे.

# भारताचा मानबिंदू : भारतीय वायुदल

दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात भारतीय वायुदल दिन म्हणून साजरा केला जातो. ८ ऑक्टोबर १९३२ रोजी भारतीय वायुदलाची स्थापना झाली. त्यामुळे २०२६ मध्ये भारतीय वायुदल आपला ९४ वा वायुदल दिन साजरा करत आहे. देशाच्या आकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या भारतीय वायुदलाच्या शौर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा हा दिवस आहे.

भारतीय वायुदलाची सुरुवात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि मोजक्या विमानांपासून झाली. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय वायुदलाने सातत्याने आधुनिकीकरण केले. विविध देशांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच आज भारत स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेनेही वेगाने वाटचाल करत आहे. तेजससारखे स्वदेशी लढाऊ विमान, सुखोई-३० एमकेआय, राफेल, मिराज-२००० यांसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने भारतीय वायुदलाच्या सामर्थ्यात भर घालत आहेत. आधुनिक रडार, क्षेपणास्त्र प्रणाली, हवाई इंधन भरण्याची क्षमता, उपग्रहाधारित दळणवळण, नेटवर्क-केंद्रित युद्धप्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञानामुळे वायुदलाची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय वायुदलाच्या शौर्याचा इतिहास गौरवशाली आहे. १९४७-४८, १९६५ आणि १९७१च्या युद्धांमध्ये वायुदलाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः १९७१च्या युद्धात भारतीय वायुदलाने प्रभावी हवाई कारवाया करत भारतीय सैन्याच्या प्रगतीला मोठी मदत केली. या पराक्रमामुळे भारतीय संरक्षण व्यवस्थेतील वायुदलाचे महत्त्व अधोरेखित झाले. कारगिल युद्धातील अतुलनीय पराक्रम

१९९९चे कारगिल युद्ध भारतीय वायुदलाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे. या युद्धात भारतीय वायुदलाने 'ऑपरेशन सफेद सागर' अंतर्गत महत्त्वाची हवाई कारवाई केली. अतिशय उंच आणि कठीण पर्वतीय प्रदेशात शत्रूच्या ठिकाणांवर अचूक हल्ले करणे हे मोठे आव्हान होते. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती, उंच पर्वत आणि हवामान यांचा सामना करत भारतीय वायुदलाने शत्रूच्या तळांवर हवाई हल्ले करून भारतीय सैन्याच्या कारवाईला मोठे पाठबळ दिले. या मोहिमेने भारतीय वायुदलाच्या धैर्याबरोबरच त्याच्या अचूक नियोजनाची आणि युद्धकौशल्याची जगाला जाणीव करून दिली. बालाकोट एअर स्ट्राईक : दहशतवादाला चोख प्रत्युत्तर पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी बालाकोट येथे एअर स्ट्राईक केला. भारतीय वायुदलाच्या मिराज-२००० विमानांनी पाकिस्तानातील बालाकोट परिसरातील दहशतवादी प्रशिक्षण तळांवर हवाई कारवाई केली. या कारवाईने दहशतवादाला भारताचे धोरणात्मक आणि लष्करी प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य जगासमोर दाखवून दिले. या एअर स्ट्राईकमुळे भारतीय वायुदलाची अचूक हवाई हल्ला करण्याची क्षमता पुन्हा एकदा चर्चेत आली. ऑपरेशन सिंदूर : नव्या युगातील हवाई सामर्थ्य ऑपरेशन सिंदूरने भारतीय वायुदलाच्या आधुनिक युद्धक्षमता आणि संयुक्त लष्करी कारवाईतील महत्त्व अधोरेखित केले. दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सशस्त्र दलांनी लक्ष्यित आणि समन्वित कारवाई केली. या कारवाईत भारतीय वायुदलाने आधुनिक लढाऊ विमाने, अचूक शस्त्रप्रणाली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली क्षमता दाखवून दिली. शत्रूच्या संभाव्य हवाई धोक्यांचा सामना करण्यासाठी रडार, हवाई संरक्षण प्रणाली, गुप्तचर माहिती आणि नेटवर्क-केंद्रित युद्धतंत्र यांचे महत्त्वही या कारवाईत प्रकर्षाने समोर आले.

भारतीय वायुदलाची ताकद केवळ लढाऊ विमानांमध्ये नाही. वैमानिक, तंत्रज्ञ, अभियंते, हवाई वाहतूक नियंत्रक, वैद्यकीय पथके आणि जमिनीवर अहोरात्र काम करणारे हजारो कर्मचारी हे त्याचे खरे सामर्थ्य आहेत. विमान आकाशात झेपावण्यापूर्वी त्यामागे असंख्य हातांचे कष्ट असतात. देशाच्या सुरक्षेसाठी हे सर्व जण आपले कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडतात.

भारतीय वायुदलाचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात बचावकार्य, अन्न व औषधांची वाहतूक, दुर्गम भागात मदत पोहोचविणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे अशा मानवतावादी कार्यातही वायुदल नेहमीच आघाडीवर राहिले आहे. आजच्या काळात युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पारंपरिक लढाऊ विमानांबरोबरच ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर युद्ध, इलेक्ट्रॉनिक युद्ध, उपग्रह तंत्रज्ञान आणि मानवरहित युद्धप्रणाली यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे भारतीय वायुदलाला भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे लागणार आहे. त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादनाला अधिक चालना देणेही गरजेचे आहे.

भारतीय वायुदल हा केवळ संरक्षण दलाचा एक भाग नाही, तर तो भारताच्या सामर्थ्याचा, आत्मविश्वासाचा आणि राष्ट्राभिमानाचा मानबिंदू आहे. देशाच्या आकाशात तिरंगा अभिमानाने फडकत राहावा, भारताच्या सीमांकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे धाडस कोणालाही होऊ नये आणि देशातील नागरिक सुरक्षित राहावेत यासाठी भारतीय वायुदलाचे वीर सदैव सज्ज असतात.

कारगिलच्या बर्फाच्छादित पर्वतांपासून बालाकोटपर्यंत आणि ऑपरेशन सिंदूरपर्यंत भारतीय वायुदलाने वेळोवेळी आपल्या पराक्रमाची प्रचिती दिली आहे. या शूर जवानांच्या धैर्यामुळेच देशवासीयांचा भारतीय वायुदलावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. आकाशाची उंची गाठणाऱ्या आपल्या वीरांना सलाम!

भारताच्या नभांगणाचे रक्षण करणाऱ्या भारतीय वायुदलाला मनःपूर्वक अभिवादन!

भारतीय वायुदल दिनाच्या सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

पान १ वरुन...

### दुष्काळी परिस्थितीच्या...

ग्रामसभांमध्ये अनुज्ञेय ३७५ कामांची माहिती नागरिकांसमोर प्रदर्शित करून व्हीजीपीपी आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामांना प्राधान्यक्रम ठरविताना महिला, भूमिहीन मजूर, अल्पभूधारक आणि संवेदनशील वस्त्यांतील नागरिकांचा सहभाग प्राधान्याने घ्यावा, असेही सांगण्यात आले. प्राप्त प्रस्ताव, ग्रामपंचायतीचा नकाशा, जल अंदाजपत्रकाचा आराखडा आणि प्रत्यक्ष स्थळ पडताळणीच्या आधारे ग्रामसभा घेऊन कामांचे नियोजन करावे. आर्थिक वर्ष २०२७-२८ साठी व्हीजीपीपी आराखडा २ ऑक्टोबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत तयार करावा. १५ जानेवारीपूर्वी कामकाज व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करून युक्तधारा मालमत्ता सूची, पीआरए, गॅप असेसमेंट आणि जिओलोकेशन यांची सांगड घालत अपेक्षित मनुष्यदिवसांसह कामांचा सेल्फ तयार करून आराखडा जिल्हा कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. व्हीबीजी रामजी संकेतस्थळावर '' प्रणालीद्वारे कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यपद्धती तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना कामांचे मोजमाप घेण्यासाठी ई-मेजरमेंट (-) नोंदणी करण्याबाबत कार्यक्रम व्यवस्थापक एस. आर. देवढे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी बैठकीत रोजगार हमी योजना, जलसंधारणाची कामे आणि आगामी नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

### जालन्यात 'विकसित...

भास्कर आबा दानवे यांनी पंतप्रधान मोदीजींच्या २५ वर्षांच्या सेवाप्रवासाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, ''जनतेचा विश्वास हीच प्रेरणाशक्ती मानून आदरणीय मोदीजींनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली. गेल्या २५ वर्षांत त्यांनी एकही दिवस विश्रांती न घेता देशाच्या विकासासाठी, गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांचा हा प्रवास आपल्या सर्व कार्यकर्त्यांसाठी आदर्श आणि प्रेरणादायी आहे. असे त्यांनी सांगितले.

यावेळी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, महिला मोर्चा मंडळ अध्यक्षा सुषमाताई खरात, रश्मी टेकवाणी, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र भोसले, नगरसेवक महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, सुशीलाताई दानवे, सखुबाई पणबिसरे, श्रद्धा साळवे, शोभाबाई नारीयलवाले, कल्याण भदनेकर, ज्योती सले, पदमा मानधनी, मजहर सय्यद, पूनम स्वामी, रिमा खरात (काळे), जगदीश भरतिया, विनोद रत्नपारखे, वीरेंद्र धोका, आनंद झारकंडे, सोपान पेंढारकर, शीतलप्रसाद पांडे, प्रभुलाल गोमतीवाले, सिध्देश्वर हाजबे, अशोक आडेकर, जीवन सले, दुर्गेश कुरील, सोमेश काबलिये, रोहित खोडवे, शाम उगले, संतोष खंडेलवाल, रोहित भूरेवाल, आकाश देशमाने, संजय भगत, विनोद शिनगारे, मनोज इंगळे, कपिल अनभोरे, शिवराज नारीयलवाले, गोविंद भताने, राज स्वामी, पांडुरंग आहेरकर, शाम जाधव, बापू साळवे, गौरव गोधेकर, राजेश देसार, सिद्धेश्वर गोरे, गोवर्धन उबाळे, कैलास सोळुंके, बजरंग राजपूत, राहुल यादव, यश खरात, राजाराम जाधव, कृष्णा गायके, गुलाब पणबिसरे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.सेवा संकल्प सभेनंतर सेवा ज्योती यात्रा स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथून जनार्धन मामा चौक पर्यंत काढण्यात आली. सेवा ज्योतीच्या माध्यमातून राष्ट्रसेवेची ही अखंड ज्योत पुढे नेण्याचा आणि विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी योगदान देण्याचा निर्धार यावेळी केला.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना...

नये, यासाठी सर्व बँकांनी या उपाययोजनांची विशेष प्राधान्याने अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

### भोकरदन तालुक्यात...

पतसंस्थांकडून कर्ज घेऊन पेरणी केली होती, त्यांचे कर्ज सरसकट माफ करावे आणि शेती पंपांचे वीजबिल थकीत असले तरी वीज जोडणी खंडित करू नये.

**चारा आणि पाणी टंचाईचे संकट**

पिके जळाल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशासनाने गावात तात्काळ टँकर सुरू करावेत आणि जनावरांसाठी चारा छावण्यांचे नियोजन करावे.

''शेतकऱ्यांनी कर्ज काढून, पदरमोड करून पेरण्या केल्या. मात्र निसर्गाच्या अवकृपेमुळे आज भोकरदन तालुक्यातील आणि विशेषतः हसनाबाद वर्तुळातील संपूर्ण पिके डोळ्यादेखत करपून गेली आहेत. अशा कठीण प्रसंगी सरकारने बळीराजाला वाऱ्यावर न सोडता तातडीने आर्थिक मदत दिली पाहिजे. प्रशासनाने तालुक्यात तात्काळ पंचनामे सुरू न केल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.''

प्रवीण फुके पाटील (उपजिल्हाप्रमुख, शिवसेना)

### सुरळीत वीजपुरवठा...

करत आहेत. त्यामुळे विजेच्या वापराबाबत दुष्काळाच्या काळात सर्वांनी संयम आणि सहकार्याची भूमिका ठेवणे आवश्यक आहे, असे आवाहन आमदार लोणीकर यांनी केले.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबाला दरवर्षी सहा हजार रुपये तीन हप्त्यांत थेट खात्यावर दिले जातात. मार्च २०२६ पर्यंत २२ हप्त्यांत केंद्राने ४.२७ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली आहे. महाराष्ट्रात नमो शेतकरी महासन्मान निधीच्या माध्यमातून राज्य सरकारकडूनही शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक मदत दिली जात आहे. पीक विम्याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी काँग्रेसच्या काळातील व्यवस्थेवर टीका करत, ''काँग्रेसच्या काळातील पीक विमा म्हणजे रतन खत्रीचा मटका; कोट्यवधी शेतकरी विमा भरायचे आणि मोजक्याच शेतकऱ्यांना लाभ मिळायचा,'' अशी टीका केली. मोदी सरकारने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत बदल करून कमी आणि निश्चित प्रीमियमच्या माध्यमातून व्यापक जोखीम संरक्षण देण्याची पद्धत आणली, असे त्यांनी सांगितले. सध्याच्या योजनेत पेरणीपूर्व टप्प्यापासून काढणीनंतरच्या नुकसानीपर्यंत विविध जोखमींचा समावेश आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणअंतर्गत ऑगस्ट २०२६ पर्यंत राज्यांना ४.१८ कोटी घरांचे लक्ष्य देण्यात आले असून ३.९१ कोटी घरे मंजूर आणि ३.१२ कोटी घरे पूर्ण झाली आहेत. प्रधानमंत्री स्वनिधी योजनेत जुलै २०२६ पर्यंत ७६.९५ लाख फेरीवाल्यांनी १.१५ कोटींहून अधिक तारणमुक्त कर्जे घेतली असून त्यांची एकूण रक्कम सुमारे १८,४७५ कोटी रुपये आहे. जल जीवन मिशनच्या सुरुवातीला केवळ ३.२३ कोटी ग्रामीण घरांना नळजोडणी होती; मार्च २०२६ पर्यंत ही संख्या सुमारे १५.८२ कोटी घरांवर पोहोचली. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेत ३० लाख पारंपरिक कारागिरांची नोंदणी झाली असून कौशल्य प्रशिक्षण, टूलकिट आणि कर्जाच्या माध्यमातून त्यांच्या व्यवसायाला आधार दिला जात आहे.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी गरीब कुटुंबांतील महिलांना स्वच्छ स्वयंपाकाच्या इंधनाची एलपीजी जोडणी उपलब्ध झाली आणि धुरापासून महिलांना दिलासा मिळाला. लखपती दीदी उपक्रमाचा उद्देश ग्रामीण स्वयं-सहायता गटातील महिलांना शाश्वतपणे वर्षाला किमान एक लाख रुपये उत्पन्न मिळवून देणे हा आहे; जुलै २०२६ पर्यंत ३.४६ कोटींपेक्षा अधिक महिला 'लखपती दीदी' म्हणून सक्षम झाल्याची केंद्राची माहिती आहे. मुलींच्या भविष्यासाठी सुरू करण्यात आलेल्या सुकन्या समृद्धी योजनेत डिसेंबर २०२५ पर्यंत ४.५३ कोटींपेक्षा अधिक खाती उघडली असून त्यामध्ये ३.३३ लाख कोटी रुपयांहून अधिक ठेवी जमा झाल्या आहेत. महिलांना स्वावलंबन, आर्थिक सुरक्षितता आणि मुलींच्या भवितव्याची हमी देणाऱ्या या योजनांमुळे महिला सक्षमीकरणाचा विषय प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचे आमदार लोणीकर यांनी नमूद केले. मोदी सरकारपूर्व काळात वैद्यकीय आणि उच्च तंत्रशिक्षणाच्या मर्यादित जागांमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जावे लागत असे आणि प्रवेशाच्या संधींबाबत मोठी स्पर्धा होती, असा मुद्दा आमदार बबनराव लोणीकर यांनी मांडला. अधिकृत आकडेवारीनुसार २०१३-१४ मध्ये देशात ३८७ मेडिकल कॉलेज होती; २०२४-२५ मध्ये ही संख्या ७६६ झाली, म्हणजे ९८ टक्क्यांची वाढ झाली. एमबीबीएस जागा ५१,३४८ वरून १,१५,८१२ आणि पदव्युत्तर वैद्यकीय जागा ३१,१८५ वरून ७३,१११ झाल्या. २०१४ मध्ये देशात १६ आयआयटी होती; मे २०२५ पर्यंत ही संख्या २३ झाली, तर आयआयएमची संख्या १३ वरून २१ झाली. एम्सची संख्याही २०१४ नंतर २३ नवीन एम्स व वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले असून नव्या संस्थांमुळे वैद्यकीय शिक्षण आणि उच्चस्तरीय आरोग्यसेवेच्या संधींचा विस्तार झाला आहे. त्यामुळे आज वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी देशात पूर्वीपेक्षा अधिक संस्थात्मक पर्याय उपलब्ध असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या विविध पायाभूत सुविधा योजनांसोबत महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली रस्ते, वीज आणि पिण्याच्या पाण्याच्या पायाभूत सुविधांना गती देण्यात येत असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. जल जीवन मिशनमुळे ग्रामीण महाराष्ट्रासह देशातील घरांपर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याचे मोठे काम सुरू आहे. महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी मोफत वीजपुरवठ्याच्या योजनाही राबवल्या असून राज्याच्या अधिकृत माहितीनुसार ४४ लाखांहून अधिक पात्र कृषीपंपधारक शेतकऱ्यांना २५,०८७ कोटी रुपयांच्या वीज देयकात सवलत देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी, वीजबिल सवलत आणि इतर निर्णयांमुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न झाला आहे, असे लोणीकर म्हणाले. मराठवाड्याचा दुष्काळ कायमस्वरूपी हटविण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड हा महत्त्वाचा प्रकल्प असून येणाऱ्या अधिवेशनात मराठवाड्यातील सर्व आमदारांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन हा प्रकल्प मार्गी लावण्याची विनंती करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठवाड्यात यंदा पावसातील मोठ्या तफावतीमुळे अनेक भागांमध्ये खरीप पिके, पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या हातातील पीक वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणे आवश्यक असून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला असून मदतीच्या उपाययोजनांना गती दिली आहे. पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी मदतीचा निधी दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यात जमा होतील. शेतकरी संकटात असताना सरकार त्यांना एकटे सोडणार नाही; मराठवाड्याचा दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी पाणी आणि सिंचनाच्या दीर्घकालीन उपाययोजनांवरही आम्ही ठामपणे काम करू, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार तुषार राठोड, भाजपा नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, गंगाधर राठोड, खुशालराव पाटील, बालाजी पाटील, उत्तमराव चव्हाण, विजय धोंडगे, गंगाप्रसाद यण्णावार, व्यंकटराव जाधव, माधवराव साठे, राजकुमार बामणे, माधवराव मुसळे, नागनाथ लोखंडे, हेमंत कंकरे, बालाजी पाटील शेळगावकर, किशोरसिंग चव्हाण, लक्ष्मणराव खैरकेकर, शेखर देशमुख बाराळीकर, हनुमंत पाटील नरोटे, व्यंकटराव लोहबंदे, माधव अण्णा साठे यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सेवा संकल्प अभियान...

मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांना मिळाला. 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला साकार करण्यासाठी राष्ट्रहित,विकास आणि सेवाभावाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संकल्प करत उपस्थितांनी सामूहिक शपथ घेतली.या सेवा ज्योती कार्यक्रमास भाजपा प्रदेश सचिव सौ.रेखाताई कुलकर्णी,आमदार श्री.सुहासभाऊ शिरसाट,आमदार सौ.अनुराधाताई चव्हाण,भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. सुरेश बनकर,सेवा संकल्प अभियान प्रदेश सह संयोजक किरण पाटील,सेवा ज्योती यात्रा संयोजक सुरज लोळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला,यावेळी भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी,लोकप्रतिनिधी,कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'कार्यकर्ता संवाद व संपर्क'**

मराठवाडा प्रवासादरम्यान 'कार्यकर्ता संवाद व संपर्क' या विशेष अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे माजी आमदार स्व. शालिग्राम बसैये यांचे कनिष्ठ बंधू तथा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते श्री.दयाराम बसैये उर्फ बसैये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देण्यात आली.

भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीतील श्री.बसैये बंधू कुटुंबीयांचा प्रदीर्घ अनुभव, संघटनात्मक कार्यातील योगदान आणि त्यांच्या कार्यकाळातील अनुभव जाणून घेण्यासाठी यावेळी विशेष संवाद साधण्यात आला. त्यांच्या अनुभवातून मिळालेले मार्गदर्शन आगामी संघटनात्मक कार्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रदेश सरचिटणीस मा. आ. सुनिल राणे यांनी सांगितले.

ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे अनुभव, विचार आणि संघटनात्मक वाटचालीतील योगदान जाणून घेण्यासाठी सुरू करण्यात आलेले 'कार्यकर्ता संवाद व संपर्क' विशेष अभियान मराठवाड्यात सातत्याने सुरू राहणार आहे. या अभियानांतर्गत नांदेड येथेही ज्येष्ठ कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यात येणार आहे.

# निष्काम सेवेचा सुगंध, समर्पणाचे तेज ७९वा वार्षिक निरंकारी संत समागम

## जिथे प्रत्येक पाऊल सेवेकडे आणि प्रत्येक भाव समर्पणाकडे

**दिल्ली - प्रतिनिधी**

संत निरंकारी मिशनचा ७९वा वार्षिक संत समागम २३ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत समालखा येथील संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ या ठिकाणी भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. या समागमात प्रत्येक पाऊल मानवकल्याणाच्या दिशेने अग्रेसर होईल, प्रत्येक भाव समर्पणात परिवर्तित होईल आणि प्रत्येक हृदय प्रेमाच्या त्या दिव्य ज्योतीने प्रकाशित होईल, जी मानवतेला एकत्व, सद्भावना आणि प्रभुभक्तीच्या सूत्रात बांधण्याचा संदेश देते. सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन सान्निध्यात हा संत समागम प्रेम, सेवा, सद्भावना आणि मानव एकतेच्या दिव्य भावनेचा संदेश देणार आहे. या पावन समागमाची शुभवार्ता मिळाल्याने श्रद्धाळू भक्तांची हृदये आनंद, उत्साह आणि प्रभुप्रेमाच्या अनुपम अनुभूतीने प्रफुल्लित झाली आहेत.

अंतर्मनात जेव्हा प्रभूचा प्रकाश जागृत होतो, तेव्हा जीवनाची दिशाच बदलून जाते. सेवेमध्ये समर्पण, सुमिरणामध्ये शांती आणि सत्संगामध्ये सत्याची अनुभूती होऊ लागते. हीच आत्मिक चेतना आणि ब्रह्मज्ञान मनुष्याला प्रेम व प्रभुभक्तीच्या मार्गावर पुढे घेऊन जाते. याच अंतर्मनातील प्रकाश आणि चेतनेच्या नवजागरणाची दिव्य अनुभूती देणारा यंदाचा



वार्षिक निरंकारी संत समागम श्रद्धाळू भक्तांसाठी एक अनुपम आध्यात्मिक यात्रा ठरणार आहे. या वर्षीच्या संत समागमाचा प्रेरणादायी विषय आहे 'जागृती'. या दिव्य उत्सवाच्या तयारीचे कार्य श्रद्धा, समर्पण, निष्ठा आणि निःस्वार्थ सेवा-भावनेने अत्यंत उत्साहात सुरू आहे. वय, वर्ग आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या सर्व सीमा ओलांडून श्रद्धाळू भक्त तन-मनाने सेवाकार्यात तल्लीन झाले आहेत. पहाटेच्या पहिल्या किरणापासून ते संध्याकाळच्या मावळत्या प्रकाशापर्यंत समागम स्थळाचा प्रत्येक कोपरा सेवा, भक्ती आणि समर्पणाची जिवंत अनुभूती देत आहे. कोणी बांधकामाच्या कार्यात सहकार्य करत आहे, कोणी शामियाने उभारण्याच्या व सजावटीच्या सेवेत व्यस्त आहे, तर कोणी स्वच्छता, पाणी व्यवस्था आणि भोजन सेवेचे कार्य सुव्यवस्थित करण्यासाठी कार्यरत आहे. त्याचबरोबर वार्षिक निरंकारी संत समागमाच्या भव्यतेची झलक देणारे मुख्य प्रवेशद्वारही आकार घेत आहे. हे प्रवेशद्वार प्रेम, समरसता आणि आत्मिक एकत्वाच्या दिशेने पुढे जाणाऱ्या पावलांचे प्रतीक बनून श्रद्धाळूंचे स्वागत करणार आहे.

सेवेचे हे अद्भुत दृश्य त्या समर्पणाची साक्षात अभिव्यक्ती आहे, जे सद्गुरूच्या ज्ञानामुळे हृदयात जागृत होते. खरे तर जेव्हा सेवेमध्ये निःस्वार्थ भाव आणि समर्पणाची भावना जोडली जाते, तेव्हा प्रत्येक क्षण जणू आनंद आणि उत्सवाच्या अनुभूतीने भरून जातो.

सेवा-भावनेची ही अनुपम छटा पाहिल्यावर सहजच जाणवते की, सेवेकऱ्यांच्या चेहऱ्यावर परिश्रमाचा थकवा नसून समाधान आणि समर्पणाची दिव्य आभा झळकत आहे. त्यांच्यासाठी सेवा हे केवळ एक कर्तव्य नसून सद्गुरूविषयीचे प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचे माध्यम आहे. हाच तो आत्मिक आनंद आहे, जो निःस्वार्थ सेवा, भक्ती आणि सद्गुरूच्या छत्रछायेखाली जीवनाला आतून प्रकाशित करतो. सद्गुरू माता जी आपल्या प्रवचनांमधून सातत्याने सेवा, सत्संग आणि प्रभुस्मरणाचे महत्त्व सांगत प्रेरणा देतात. त्या म्हणतात

**'तन पवित्र सेवा किये, धन पवित्र दिये दान,**
**मन पवित्र हरि भजन सों, त्रिबिध होई कल्याण।'**

अर्थात, जेव्हा तन सेवेमध्ये, धन परोपकारामध्ये आणि मन प्रभुभक्तीमध्ये समर्पित होते, तेव्हाच जीवनात खऱ्या कल्याणाचा आणि आत्मिक शांतीचा मार्ग प्रशस्त होतो. समागमात सहभागी होणाऱ्या श्रद्धाळू भक्तांच्या सुविधेसाठी सर्व आवश्यक व्यवस्था सुयोग्य पद्धतीने करण्यात येत आहेत. सेवा, सत्कार आणि आपुलकीची हीच भावना प्रत्येक श्रद्धाळूला सन्मान, सौहार्द आणि आत्मीयतेने परिपूर्ण वातावरणाचा अनुभव देईल. निःसंशयपणे, हा संत समागम केवळ एक आयोजन नसून मानवता, समरसता आणि एकत्वाचा अनुपम उत्सव आहे. विविध संस्कृती आणि सामाजिक पार्श्वभूमीतून आलेले श्रद्धाळू येथे 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेला साकार करत सद्गुरूंच्या अमृतवाणीने आपल्या अंतर्मनाला प्रकाशित करतात. प्रेम, शांती आणि मानव एकतेच्या या दिव्य महापर्वामध्ये प्रत्येक बंधू-भगिनी आणि सज्जन भक्तांचे मनःपूर्वक हार्दिक स्वागत आहे.

# वर्दी अंगावर घेतली अन् १८ वर्षे कर्तव्याला वाहिली..

## ना दिवसाची पर्वा, ना रात्रीची; वर्दीचा सन्मान जपत संगीता मोकशे यांचा बेदाग सेवाप्रवास

**भोकरदन - प्रतिनिधी**

वर्दी फक्त अंगावर चढवायची नसते;तिचा सन्मान आयुष्यभर जपायचा असतो.याच भावनेने पोलीस सेवेत तब्बल १८ वर्षे अविरत सेवा बजावत संगीता मोकशे यांनी कर्तव्यनिष्ठेचा ठसा उमटविला आहे. प्रामाणिकपणा, शिस्त आणि जबाबदारीला सर्वोच्च स्थान देत त्यांनी आपल्या सेवाकाळात वर्दीची प्रतिष्ठा कायम जपली.सन २००८ मध्ये पोलीस सेवेत प्रवेश केल्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालय,जालना येथे त्यांनी सेवा बजावली. त्यानंतर २०१८ मध्ये भोकरदन पोलीस ठाण्यात बदली झाली. जबाबदारी कोणतीही असो,कर्तव्य बजावण्याची तळमळ मात्र कायम राहिली.सेवेतील सातत्य आणि कार्यनिष्ठेची दखल घेत २०२२ मध्ये पोलीस नाईक,तर २०२४ मध्ये पोलीस हेडकॉन्स्टेबल म्हणून पदोन्नती मिळाली.पद बदलले,जबाबदाऱ्या वाढल्या; मात्र वर्दीशी असलेली निष्ठा आणि कर्तव्याची धार कायम राहिली.२०२३ पासून पारध पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या मोकशे नागरिकांशी संयमाने संवाद साधत कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात योगदान देत आहेत. पोलिसांच्या सेवेत वेळेला मर्यादा नसते; सण असो,उत्सव असो किंवा कौटुंबिक जबाबदाऱ्या कर्तव्याची हाक आली की वर्दी प्रथम, हेच त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.



# मराठवाड्याची शान! माकणीच्या नंदिनीची मध्ये घवघवीत भरारी

## ७८ टक्के गुणांसह वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण; 'मेडिसिन' विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक

**अहमदपूर - प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील माकणी गावची कन्या कुमारी नंदिनी राजन माकणीकर हिने या वैद्यकीय क्षेत्रातील परीक्षेत ७८ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे 'मेडिसिन' या विषयात तिने आपल्या महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे माकणीसह संपूर्ण लातूर जिल्हा आणि मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नंदिनी ही रिपब्लिकन पॅन्थर चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा दिवंगत ईश्वर कांबळे यांची नात आणि महाराष्ट्रातील नामवंत विद्रोही पत्रकार, सामाजिक विश्लेषक व स्तंभलेखक डॉ. राजन माकणीकर यांची सुकन्या आहे. जिद्द, चिकाटी, अथक परिश्रम आणि ध्येयाप्रती असलेल्या प्रामाणिक निष्ठेच्या बळावर नंदिनीने हे यश मिळवले आहे. तिच्या शैक्षणिक प्रवासात डॉ. मधुसूदन तलंकी यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शनही मोलाचे ठरले.

**आजोबांचे स्वप्न, नंदिनीने केले साकार**

दिवंगत ईश्वर कांबळे यांची आपल्या नातीला डॉक्टरच्या रूपात पाहण्याची मनापासून इच्छा होती. आज ते प्रत्यक्ष या आनंदाच्या क्षणी तिच्यासोबत नसले, तरी त्यांच्या स्वप्नाची पूर्तता नंदिनीने करून दाखवली आहे. त्यामुळे तिचे हे यश केवळ एका विद्यार्थिनीचे यश नसून एका आजोबांच्या स्वप्नाला मिळालेली भावपूर्ण सलामी आहे.

**बहुजनांच्या रुग्णसेवेचे ध्येय**

बुद्ध-शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा वारसा लाभलेल्या नंदिनीने आपल्या वैद्यकीय व्यवसायाकडे केवळ करिअर म्हणून न पाहता सामाजिक बांधिलकी म्हणून पाहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. नंदिनी म्हणते,**

''कोणताही रुग्ण केवळ उपचाराअभावी दगावला नाही पाहिजे. शिक्षण आणि आरोग्य हे बहुजन समाजासाठी अत्यंत मोलाचे आहेत. त्यामुळे माझ्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग दिन-दलित, वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी करण्याचा माझा प्रयत्न राहील. प्रामाणिकपणे, स्वाभिमानाने आणि संवेदनशीलतेने रुग्णसेवा करणे हेच माझे ध्येय आहे.''

नंदिनीच्या या विचारांतून तिच्या वैद्यकीय शिक्षणामागील सामाजिक जाणीव आणि माणुसकीची भूमिका स्पष्टपणे दिसून येते.

**मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव**

नंदिनीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रिपब्लिकन सेनानी मा. आनंदराज आंबेडकर, आंतरराष्ट्रीय बौद्ध भिक्षू भन्ते विशुद्धानंद बोधी तसेच भन्ते शिलबोधी थेरो यांनी तिचे अभिनंदन करून भावी वैद्यकीय वाटचालीसाठी आशीर्वाद व शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

नंदिनीचे हे यश ग्रामीण भागातील आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. माकणीच्या मातीतून डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते प्रत्यक्षात साकार करणाऱ्या नंदिनीने आपल्या कर्तृत्वाने लातूर जिल्ह्याची आणि मराठवाड्याची मान उंचावली आहे. तिच्या या यशामागे कुटुंबीयांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची अथक मेहनत आहे. भविष्यात वैद्यकीय ज्ञानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवण्याचा तिचा संकल्प निश्चितच कौतुकास्पद आहे.

नंदिनीच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील वैद्यकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# राजकीय दबावातून करण खरात यांना अटक केल्याचा आरोप

## भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष सुभाष दांडेकर यांची निष्पक्ष तपासाची मागणी



**जालना - प्रतिनिधी**

जळगाव (सोमनाथ) येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी मौजपुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा क्रमांक ३२३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. मात्र, कोणताही ठोस पुरावा नसताना राजकीय व सामाजिक दबावातून करण मधुकर खरात यांना आरोपी करण्यात आल्याचा आरोप भीम आर्मीने केला आहे.

करण खरात हे मोलमजुरी करणारे असून त्यांचा या घटनेशी कोणताही संबंध नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजसह सर्व तांत्रिक पुराव्यांची सखोल तपासणी करून खऱ्या आरोपीवर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.निवेदनावर भीम आर्मीचे जालना जिल्हाध्यक्ष सुभाष दांडेकर यांच्यासह जिल्हा सल्लागार एम. यू. पठाण यांच्यासह वरिष्ठ उपाध्यक्ष राम राजेभाऊ कदम, माजी सरपंच ब्रम्हानंद कदम, जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ आढाव, ज्ञानेश्वर कारभारी मोरे, नाथाजी कदम व भाऊसाहेब निवृत्ती कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जालन्याची आई माऊलीचे भव्य-दिव्य आगमन

**जालना – प्रतिनिधी**

एफ.एफ. फाउंडेशन श्री म्हसोबा महाराज सार्वजनिक नवरात्र महोत्सव, जालना यांच्या वतीने जालन्याची आई माऊलीच्या भव्य–दिव्य आगमन सोहळ्याचे आयोजन गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे करण्यात आले आहे.यावर्षी मंडळाच्या वतीने देवीची तब्बल २५ फूट उंचीची भव्य मूर्ती स्थापित करण्यात येणार आहे. या भव्य आगमन सोहळ्यात जालना शहरातील सर्व लहान–मोठ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.महिला भगिनींसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, महिलांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या आयोजनासाठी आकाश रांजणकर, अमित रांजणकर, बालाजी महेश्वर, विनित महेश्वर, रोहित लिंगम, विनायक सदगुरे, पवन सदगुरे, रितिक सदगुरे, सोहम राठोड, आदर्श लिंगम, क्रिश लिंगम, तुषार सदगुरे, सानिध्य रांजणकर व यश रांजणकर यांनी जालना शहरातील नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजना

## जलस्रोतांचे मॅपिंग, वॉटर ऑडिट आणि अवैध पाणी उपसा रोखण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आज दोन महत्त्वपूर्ण बैठका घेण्यात आल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह जलसंपदा, मृद व जलसंधारण, लघु पाटबंधारे तसेच सिंचन व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, जालना व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील पाणी उपलब्धता, जलस्रोतांची स्थिती, पिण्याचे पाणी, अवैध पाणी उपसा, पशुधनासाठी चारा आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील जलस्रोतांमधून होणारा अवैध आणि अनधिकृत पाणी उपसा तातडीने थांबविण्याचे निर्देश देण्यात आले. अनधिकृत पाणी उपशासाठी वापरल्या जाणाऱ्या मोटारी व पंपांवर नियंत्रण ठेवून नियमित तपासणी करावी आणि आवश्यक ती कारवाई करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्रत्येक गावातील विहिरी, बोअरवेल, तलाव, बंधारे, जलाशय आणि इतर जलस्रोतांचे गावनिहाय मॅपिंग करण्यात येणार आहे. या जलस्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा आणि त्यांची सद्यस्थिती याची माहिती संकलित करून त्यानुसार पाण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**गावनिहाय वॉटर ऑडिट**

प्रत्येक गावातील पाण्याचे 'वॉटर ऑडिट' करण्याचे निर्देश देण्यात आले. उपलब्ध पाणी किती आहे, त्याचा वापर कुठे आणि किती होत आहे, भविष्यात किती पाण्याची गरज भासणार आहे, याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार पाणी बचत आणि संवर्धनाच्या उपाययोजना केल्या जाणार आहेत.

**गाळ उपशाला प्राधान्य**

तलाव, बंधारे आणि इतर जलसाठ्यांची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक ठिकाणी गाळ उपसा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे उपलब्ध जलस्रोतांची क्षमता वाढवून अधिक पाणी साठविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनासाठी २५० गाव दत्तक घेण्याच्या उपक्रमाला अधिक चालना देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. या माध्यमातून गावांमध्ये जलस्रोत संवर्धन, पाणी बचत आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. दुष्काळी परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक तहसील स्तरावर नियमित बैठका घेण्यात येणार आहेत. पाणी उपलब्धता, संभाव्य टंचाईग्रस्त भाग आणि आवश्यक उपाययोजनांचा सातत्याने आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणी बचतीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना शिक्षण विभागाला देण्यात आल्या. 'पाणी वाचवा, पाणी जपवा' या संदेशासह जलस्रोत संवर्धन आणि पाण्याचा काटकसरीने वापर याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

'शेतकरी संवाद सभा'च्या माध्यमातून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांचे समुपदेशन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. उपलब्ध पाण्यानुसार पीक नियोजन, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि जलसंधारण याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**प्रशासनाची सातत्याने नजर**

जिल्ह्यातील पाणी परिस्थितीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या स्तरावरून सातत्याने देखरेख ठेवण्यात येणार आहे.

संबंधित विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा नियमित अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

''दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संभाव्य परिस्थितीचा आधीच अंदाज घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याचा काटकसरीने वापर यासाठी नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा आहे,'' असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

# जिल्ह्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीसाठी प्रशासनाचे कडक निर्बंध

**जालना - प्रतिनिधी**

'एल निनो'च्या सक्रियतेमुळे यंदा जालना जिल्ह्यात सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाल्याने भूजलपातळीत मोठी घट झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागात पाणीटंचाईची तीव्रता वाढली असून, उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्यासाठी सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने पाणी बचतीसाठी कडक उपाययोजना लागू केल्या आहेत.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नागरिकांसाठी मार्गदर्शक नियमावली जाहीर केली असून, शहर व ग्रामीण भागात पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाणीटंचाईचा मुकाबला करण्यासाठी प्रशासनाने विविध उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

शहरी भागात वाहने धुण्यास बंदी घालण्यात आली असून, पाणीटंचाई संपेपर्यंत घरगुती नळाच्या किंवा बोअरवेलच्या पाण्याने वाहने धुण्यास तसेच रस्ते व अंगणात पाणी मारण्यास पूर्णपणे बंदी राहणार आहे. वाहन पुसण्यासाठी केवळ ओल्या कापडाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.तसेच स्विमिंग पूल व बांधकामासाठी पाण्याचा वापर बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. व्यावसायिक व खाजगी स्विमिंग पूल तात्काळ बंद ठेवण्याचे, तर नवीन बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर पूर्णपणे थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नळ गळती व पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

ग्रामीण भागात अनधिकृत पाणी उपशावर बंदी घालण्यात आली असून, धरण, कालवे, नद्या व तलावांमधून पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल व जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांकडून गस्त घालण्यात येणार आहे. टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा वापर केवळ पिण्यासाठी व घरगुती कारणांसाठी करण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत.

शेतीसाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, उपलब्ध पाण्याचे नियोजन करूनच पिकांची निवड करण्याचे निर्देश शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र भूजल अधिनियम २००९ नुसारही विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सार्वजनिक जलस्रोतांपासून ५०० मीटर अंतराच्या परिसरात पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी नवीन विहीर किंवा बोअरवेल खोदण्यास बंदी आहे. तसेच ६० मीटरपेक्षा (२०० फूट) अधिक खोलीच्या बोअरवेल खोदण्यावर निर्बंध असून, अनधिकृत विंधन विहिरी खोदल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर विपरीत परिणाम करणाऱ्या खासगी विहिरी किंवा बोअरवेलमधून पाणी उपसा करण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि बोअरवेल रिचार्ज करणेही शहरी व निमशहरी भागातील १०० चौ. मीटर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या इमारती व सोसायट्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

''पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरा, प्रशासनाला सहकार्य करा आणि पाणी बचतीच्या नियमांचे काटेकोर पालन करा,'' असे आवाहन जिल्हा प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

# अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी दोषींवर कायदेशिर कारवाई करावी : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक व सेवनाला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, तसेच अंमली पदार्थांचे सेवन करणारे तसेच विक्री करणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक ज्ञानेश्वरी आहेर, उपविभागीय अधिकारी रामदास दौड, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी सहाय्यक आयुक्त जीवन जाधव, सीजीएसटी अधिक्षक आनंद काकणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरिक्षक पंकज जाधव यांची उपस्थिती होती. तर पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधू यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हे ऑनलाईन बैठकीस उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाल्या की, जिल्ह्यातील अंमली पदार्थांची उपलब्धता, विक्री व वाहतूक रोखण्यासाठी पोलिस, महसूल, कृषी, अन्न व औषध प्रशासन, आरोग्य, शिक्षण या विभागांनी समन्वयाने काम करण्याची गरज आहे. जिल्ह्यातील संशयास्पद ठिकाणे शोधन त्याठिकाणी नियमित तपासणी करावी. अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी प्रभावी गस्त वाढविणे तसेच संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. शाळा-महाविद्यालयाच्या शेजारील टपरी-दुकानामार्फत अंमली पदार्थांची विक्री किंवा तस्करी करणाऱ्या व्यक्ती व घटकांची माहिती संकलित करून त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. नागरिकांनीही अंमली पदार्थांच्या गैरव्यवहाराबाबत प्रशासनाला माहिती देऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. अंमली पदार्थमुक्त जिल्हा निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने आणि प्रभावीपणे कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे युवकांच्या आरोग्यावर तसेच त्यांच्या सामाजिक व कौटुंबीक जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि युवकांमध्ये जनजागृती करण्यावर भर देण्यात यावा. शाळा आणि महाविद्यालयापुरतेच मर्यादित न राहता गावपातळीवर देखील अंमली पदार्थाच्या सेवनाच्या दुष्परिणामाची व्यापक जनजागृती करावी. युवा पिढी हे देशाचे भविष्य आहे. त्यामुळे तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे. परंतु कुटुंब, शाळा, महाविद्यालये आणि समाजाने देखील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या. पोलीस अधिक्षक संधु म्हणाले की, अन्न् व औषध प्रशासनाने जिल्ह्यातील औषधी दूकानांची नियमित तपासणी करावी. प्रिक्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होता कामा नये. तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी. शाळा महाविद्यालय शेजारील टपऱ्यांवर विशेष लक्ष ठेवून अमली पदाथाची विक्री करणाऱ्यावर कारवाई करावी. जिल्ह्यात खसखस किंवा गांजा पिकाची अवैध लागवड होणार नाही याची सर्व कृषी विभागाने दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील शहरी आणि तालुकास्तरावरील संवेदनशील ठिकाणे शोधून त्याठिकाणी नियमित तपासणी करावी. तसेच खासगी ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करुन, दोषींवर कठोर कारवाई करावी. यावेळी अंमली पदार्थांविरुध्द गुन्हे व करावयाची कार्यवाहीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला.

## थकीत कर्जदारांसाठी ५० टक्के व्याजमाफीची ओटीएस योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत योजनेचा लाभ घेता येणार

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या कर्जाची थकबाकी असलेल्या कर्जदारांसाठी एकरकमी कर्ज परतावा () योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या पात्र कर्जदारांना थकीत व्याजामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ हे राज्य शासनाच्या पूर्ण मालकीचे उपक्रम असून, महामंडळामार्फत इतर मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांसाठी स्वयंरोजगाराच्या विविध योजना राबविण्यात येतात. महामंडळाच्या थकीत कर्ज रकमेचा एकरकमी परतावा () योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत राबविण्यात येणार आहे. महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी या सवलतीच्या योजनेचा लाभ घेऊन आपले कर्ज खाते निकाली काढावे व कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. एम. राठोड यांनी केले आहे.

# एचपीव्ही लसीकरणासह आरोग्यविषयक उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना - प्रतिनिधी**



सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये एचपीव्ही लसीकरण, कर्करोग प्रतिबंधाबाबत जनजागृती तसेच छातीच्या क्ष-किरण तपासणी शिबिरांचा समावेश होता. प्राथमिक आरोग्य केंद्र नळणी बु. अंतर्गत राजूर येथील मोरेश्वर शाळेतील ६ मुलींना एचपीव्ही लसीकरण करण्यात आले. एचपीव्ही लसीकरणामुळे महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून प्रतिबंध होण्यास मदत होते. या उपक्रमातून मुलींमध्ये एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अन्वा येथे एचपीव्ही लसीकरणाबाबत माहिती व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींना एचपीव्ही विषाणू, त्यापासून होणारे आजार, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध आणि एचपीव्ही लसीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ‘प्रतिबंध हाच उपचारापेक्षा उत्तम मार्ग’ हा संदेश देण्यात आला. या उपक्रमादरम्यान १३ मुलींना एचपीव्ही लसीकरणाचा लाभ मिळाला. तसेच ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ तिशीचा पल्ला आरोग्याचा सला या उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र केदारखेडा येथे छातीच्या क्ष-किरण तपासणीचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ७८ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ४० पुरुष आणि ३८ महिला यांचा समावेश होता. ‘सेवा संकल्प अभियान’ च्या माध्यमातून आरोग्य तपासणीसोबतच कर्करोग प्रतिबंध, एचपीव्ही लसीकरण आणि आरोग्यविषयक जनजागृतीवर भर देण्यात येत असून, नागरिकांना वेळेवर तपासणी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन आरोग्य विभाग जिल्हा परिषद जालना यांनी केले आहे.

# विडोळी येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

### खो-खो, कबड्डी व रिले स्पर्धेत शंकरनगर, पाटोदा, विडोळी व केदारवाकडीच्या खेळाडूंची बाजी

**मंठा - प्रतिनिधी**



समूह साधन केंद्र, विडोळी यांच्या वतीने आयोजित केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा विडोळी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या मैदानावर ७ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन समूह साधन केंद्र समन्वयक महेशकुमार चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धांमध्ये केंद्रातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. खो-खो, कबड्डी, रिले, व उंच उडी आदी क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले. खो-खोच्या इयत्ता पहिली ते पाचवी मुलांच्या गटात शंकरनगर, मुलींच्या गटात प्रशाला पाटोदा, तर इयत्ता सहावी ते आठवी मुलांच्या व मुलींच्या गटात विडोळी संघ विजयी ठरला. कबड्डीच्या इयत्ता पहिली ते पाचवी मुलांच्या गटात केदारवाकडी, मुलींच्या गटात विडोळी, तर इयत्ता सहावी ते आठवी मुलांच्या गटात केदारवाकडी आणि मुलींच्या गटात विडोळी संघाने विजेतेपद पटकावले. रिले स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता पहिली ते पाचवी मुलांच्या गटात सर्फराज शेख, पाटोदा प्राथमिक शाळेचा सोहम काळे व शिवम बोराडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली, तर मुलींच्या गटात भक्ती गोरे हिने बाजी मारली. इयत्ता सहावी ते आठवी मुलांच्या गटात प्रशाला पाटोद्याचा अनुज बोराडे, तर मुलींच्या गटात विडोळीची पंकजा गोरे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले. केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी समूह साधन केंद्र समन्वयक महेशकुमार चौधरी, सर्व मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक शिक्षक, पंच व नियोजक शिक्षक यांनी परिश्रम घेतले. विजयी संघ व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे जाधव सर, डवरे सर, गायकवाड सर, देशमुख सर पठाण सर, भवर सर, संतोष तोटेवाड, गंगाधर वानोळे, ठाकरे सर, टकले सर, किसन जयस्वाल यांच्यासह उपस्थित सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# विवेकानंद सेवा केंद्र,विवेकानंद इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश




**परतूर - प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विवेकानंद सेवा केंद्र, विवेकानंद इंग्लिश स्कूल चे दक्ष मेहता, अलिझा पठाण आणि विवेकानंद प्राथमिक शालेचे अभितोष जोशी या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण मांडणी, प्रभावी वक्तृत्वशैली आणि विषयावरील उत्कृष्ट पकड यामुळे उपस्थितांची मने जिंकली. या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थ्यांनी विवेकानंद सेवा केंद्राचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, आत्मविश्वास तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वपूर्ण ठरले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शेषराव बाहेकर, संदीप बाहेकर, संगीता शिंदे, प्राचार्य भालचंद्र महाजन आणि विजय धंदाले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून शाळेचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# इतर मागासवर्गीयांसाठी विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**ऑनलाइन अर्ज प्रक्रिया अनिवार्य; योजनांची व्यापक प्रसिद्धी करण्याचे आवाहन**

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राज्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या कल्याण, विकास व उन्नतीसाठी विविध कर्ज व प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाच्या कार्यालयाने केले आहे.

महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य प्रशिक्षण विकास योजना, महिला स्वयं-सिद्धी व्याज परतावा योजना, बीजभांडवल योजना तसेच थेट कर्ज योजना अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह .. या वेब पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य आहे. त्यामुळे इच्छुक लाभार्थ्यांनी संबंधित योजनेची माहिती घेऊन ऑनलाइन अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी. या योजनांमुळे इतर मागासवर्गीय समाजातील युवक, महिला तसेच पात्र लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, शिक्षण, कौशल्यविकास आणि आर्थिक उन्नतीसाठी मदत मिळणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी उपलब्ध योजनांची माहिती घेऊन विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दुष्काळाचे सावट हटेना... बचत गट चे हप्ते काही थांबेना... बचत गट वसुली तेजीत

**बदनापूर - प्रतिनिधी**



बदनापूर तालुक्या सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये २६५ पेक्षाही जास्त तालुक्यात राज्य सरकार ने दुष्काळ जाहीर केला असून अद्याप शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली नसली तरी दुष्काळ जन्य परिस्थितीत कामगारांना काम नाही, मजुरांना मजुरी मिळेना मग बचत गट च्या माध्यमातून हातावरचे लोकांनी २०-३० हजार रुपये खाजगी बचत गट बनवून घेतले खरे पण ते हप्त्याने भरावे कसे... हा प्रश्न पडला आहे.

मात्र राज्य सरकार ने पुरेसा पाऊस न पडल्याने आणि शेतात पिक पाण्या आभावी करपून गेल्याने बदनापूर तालुका दुष्काळ भागात समाविष्ठ केल्याने हाताला काम नाही, शेतात पीक नाही.. पिण्यास पाणी नाही.. मग या बचत गट चे हप्ते कोठून भरणार....

बदनापूर तालुक्यात भारत फायनान्स, ग्रामीण कोठा, इसाफ बँक आदी सह जवळ पास ८-१० फायनस आहेत यांनी लाखो रुपये महिलांचे बचत गट बनवून पैशे वाटले असून या पैशाची वसुली दर आठ दिवसाला असते... बचत गट मध्ये पैशे घेणाऱ्या महिलेच्या घरी काहीही झाले तरी हप्ता न चुकता भरला पाहिजे अशी सक्त वसुली हे करतात.. मात्र दुष्काळ होऊनही त्यांचे हप्ते वसुली सक्तीची सुरु असून याकडे शासन लक्ष देईल का.

# ग्रामसभेच्या सूचनेनंतरही मुख्याध्यापक गैरहजर; चौकशी व शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी-हनुमंत दवंडे

**परतूर - प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील येनोरा ग्रामपंचायतची ग्रामसभा २ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेस उपस्थित राहण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती परतूर तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना सूचना/पत्र दिले असतानाही ते ग्रामसभेस अनुपस्थित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार हनुमंत तुकाराम दवंडे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती परतूर यांच्याकडे केली आहे. येनोरा येथे २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. ही ग्रामसभा शासनाच्या व ’ () संदर्भातील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ग्रामविकास व पंचायत राज विभागाने २४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भात मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. दरम्यान, येनोरा ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामविकास अधिकारी महाराष्ट्रभर सुरू असलेल्या संपामुळे ग्रामसभेस उपस्थित राहणार नसल्याने संबंधित शाळेचे मुख्याध्यापक ग्रामसभेस उपस्थित राहतील, अशा आशयाचे पत्र/सूचना संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मात्र, येनोरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक उद्धव चव्हाण हे ग्रामसभेस उपस्थित राहिले नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

**लेखी सूचनेनंतरही अनुपस्थितीचा प्रश्न**

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लेखी सूचना मिळाल्यानंतरही मुख्याध्यापक ग्रामसभेस उपस्थित का राहिले नाहीत, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित दिवशी त्यांची शाळेतील उपस्थिती, रजा अर्ज, वैद्यकीय कारण, पूर्वपरवानगी किंवा अनुपस्थितीचे अन्य कोणतेही कारण असल्यास त्याची सत्यता तपासावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच संबंधित मुख्याध्यापकांना वरिष्ठ अधिकाऱ्यांची लेखी सूचना प्राप्त झाली होती का, त्यानंतर त्यांनी त्याचे पालन का केले नाही, त्या दिवशी कोणतीही अधिकृत रजा किंवा परवानगी होती का, याचीही पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**ग्रामसभेच्या अधिकारांचा मुद्दा**

तक्रारीमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील ग्रामसभेशी संबंधित तरतुदींचाही उल्लेख करण्यात आला आहे. गावात कार्यरत असलेल्या शासकीय, निमशासकीय व पंचायत कर्मचाऱ्यांच्या ग्रामसभेतील सहभागाबाबत असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने या प्रकरणाची कायदेशीर व प्रशासकीय तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामसभेच्या कामकाजावर संबंधित अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीचा काही परिणाम झाला का, शासनाच्या योजना, लोकसहभाग, विकासकामे किंवा इतर विषयांवरील चर्चेला माहितीअभावी अडथळा निर्माण झाला का, याचीही चौकशी करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे.

**ग्रामसभेच्या आयोजनाचीही चौकशी करण्याची मागणी**

दरम्यान, ग्रामविकास अधिकारी संपावर असल्याच्या परिस्थितीत ग्रामसभा आयोजित करण्यासाठी येनोरा ग्रामपंचायत कार्यालयाने अंगणवाडी सेविकेला पत्र दिले होते का, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्यक्षात ग्रामसभा नियोजित वेळेनुसार घेण्यात आली का, उपस्थिती किती होती, ग्रामसभेचे इतिवृत्त तयार करण्यात आले का, तसेच संबंधित बाबींची अधिकृत नोंद करण्यात आली आहे का, याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नोटीस बजावून खुलासा मागविण्याची मागणी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकांना नोटीस बजावून त्यांच्याकडून लेखी खुलासा मागवावा, तसेच आवश्यक असल्यास चौकशी समितीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत विनापरवानगी अनुपस्थिती किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधिकृत सूचनांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

चौकशी अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती येनोरा ग्रामपंचायत तसेच तक्रारदारास देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. भविष्यात शासनाच्या ग्रामसभा, लोकसहभाग व विकासाशी संबंधित कार्यक्रमांसाठी देण्यात आलेल्या अधिकृत सूचना संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून वेळेत पाळल्या जातील, याबाबत आवश्यक निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्याध्यापक उद्धव चव्हाण यांची ग्रामसभेच्या दिवशी अनुपस्थिती नेमक्या कोणत्या कारणामुळे झाली, त्यांना देण्यात आलेल्या सूचनेचे स्वरूप काय होते आणि त्यांच्याकडे अनुपस्थितीबाबत कोणती अधिकृत परवानगी होती का, हे प्रशासकीय चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे आता पंचायत समिती प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे येनोरा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.